सकाळ



कोल्हापूर : 'सकाळ माध्यम समूह' आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने गुरुवारपासून संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' संवादमालिकेला प्रारंभ झाला. त्याचे पहिले पुष्प प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे यांनी गुंफले. त्यावेळी हाऊसफुल्ल गर्दीने भरलेले लोककला केंद्र. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# स्वनिष्ठा हीच ऊर्जा

## सुबोध भावे; उत्स्फूर्त गर्दीच्या साक्षीने 'ऊर्जा'चा दिमाखदार प्रारंभ

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा

**कोल्हापूर, ता. २८ : "भोवतालातून किंवा दुसऱ्यांकडून आपल्याला जरूर ऊर्जा मिळते; पण ती कायम आपल्यासोबतच राहील, याची शाश्वती नसते. आपल्याला जे आवडतं, ते काम झपाटून करावं. यश-अपयशाची चर्चा जरूर होईल. पण, स्वतःवरील आणि हातात घेतलेल्या कामाविषयीची निष्ठा हीच खरी ऊर्जा असते," असे स्पष्ट मत आज प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे यांनी आज येथे व्यक्त केले.**



'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' संवादमालिकेत संवाद साधताना प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे.

संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या संवादमालिकेचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते.

दरम्यान, यानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात उत्स्फूर्त गर्दी झाली. 'सकाळ' माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने सलग चार दिवस ही मालिका रंगणार असून सर्वांना विनामूल्य प्रवेश असेल.

सुबोध भावे आघाडीचे अभिनेते, दिग्दर्शक, लेखक, सूत्रसंचालक, गायक आणि त्यापलीकडे जाऊन एक जिंदादिल माणूसही. साहजिकच संवादातून प्रत्येक पैलू उलगडत गेला.

पान ८ वर »

### सुहैल शर्मा यांच्याशी आज संवाद



सांगलीचे पोलिस अधीक्षक सुहैल शर्मा संवादमालिकेचे दुसरे पुष्प शुक्रवारी (ता. एक) गुंफणार आहेत. एव्हरेस्ट शिखर यशस्वीपणे सर करणारे ते राज्यातील पहिले पोलिस अधिकारी असून, कर्तव्यदक्ष म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत.



कोल्हापूर : 'सकाळ माध्यम समूह' आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने गुरुवारपासून संजय घोडावत ग्रुप स्टार एअरप्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' संवादमालिकेला प्रारंभ झाला. यावेळी डावीकडून 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, डॉ. भरत खराटे, संग्राम पाटील, निवासी संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड, डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, अभिनेता सुबोध भावे, 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार, डॉ. डी. टी. शिर्के, उदय जोशी, डॉ. संजय पाटील, जय कामत, प्रसाद कामत, मिलिंद कुलकर्णी.

# स्वनिष्ठा हीच ऊर्जा

» पान १ वरून

मिलिंद कुलकर्णी यांनी हा संवाद आणखी खुलवला. 'अभिनयाकडे ठरवून आलात की अपघाताने,' या प्रश्नाने सुरू झालेला हा संवाद पुढे तब्बल शंभर मिनिटं साऱ्यांनाच एका रंजक प्रवासात घेऊन गेला. सुबोध भावे म्हणाले, ''करीअरचा विचार करत असताना कधी पोलिस अधिकारी, कधी एखादा व्यावसायिक तर कधी 'एमबीए' असा गोंधळ मनात होता. पण, अभिनयात आलो आणि एकाच आयुष्यात अनेकांच्या व्यक्तिरेखा साकारायला मिळाल्या. सुरवातीच्या काळात नाटकातून काढून टाकलं. 'बाल शिवाजी' नाटकात तब्बल सतरा भूमिका केल्या; पण एकाच ओळीचा संवाद होता. मात्र, मुख्य व्यक्तिरेखा मिळाली नाही म्हणून थांबलो नाही; तर नाटकाच्या इतर सर्व तांत्रिक बाजूंचा अभ्यास केला आणि त्या यशस्वीपणे हाताळल्या. त्याचाच फायदा पुढे एकूणच करीअरसाठी झाला.''

'चंद्रपूरच्या जंगलात' हे खरं तर प्रायोगिक नाटक. त्याच्या निर्मितीची प्रक्रियाही मोठी रंजक आहे. मात्र, पुढे या नाटकाचे सर्वत्र प्रयोग केले आणि त्यातून विचारांची दिशा पक्की झाली. चांगला विषय असला, तर तो नक्कीच लोकांना आवडतो, हा आत्मविश्वास वाढला. पुण्यातून मुंबईला गेल्यानंतर स्थिर व्हायला थोडा वेळ जरूर गेला. पण, तो अनुभवही नव्याने बऱ्याच गोष्टी शिकवणारा होता, असेही ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''प्रत्येकात सळसळती ऊर्जा पेरणारा हा उपक्रम असून, शिवाजी विद्यापीठाचा त्यात सक्रिय सहभाग आहे. सुबोध भावे यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वं नव्या पिढीला अशा उपक्रमांतून भेटतात आणि ती सर्वांसाठीच दिशादर्शक ठरतात.''

'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने सलग पाचव्या वर्षी हा उपक्रम होत असून, त्याला प्रत्येक वर्षी मोठा प्रतिसाद मिळतो. भिंतींच्या आतील शिक्षणापेक्षाही भिंतींबाहेरील शिक्षण खऱ्या अर्थाने जगणं समृद्ध करीत असते. आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्ती 'ऊर्जा'तून भेटतात आणि त्या सर्वांनाच नवी प्रेरणा देऊन जातात.''

यावेळी 'सकाळ माध्यम समूहा'चे सीईओ उदय जाधव, 'सकाळ'चे निवासी संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड, उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, तनिष्क शोरूमचे प्रसाद कामत, जय कामत, चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशनचे डॉ. भरत खराटे, मार्व्हलस इंजिनीअर्सचे संग्राम पाटील, क्लायमॅक्स ॲडव्हर्टाझर्सचे उदय जोशी, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

## प्रायोजक असे...

- टायटल स्पॉन्सर : संजय घोडावत ग्रुप स्टार एअर
- सहप्रायोजक : तनिष्क शोरूम, चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन, मार्व्हलस इंजिनीअर्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- ट्रॅव्हल पार्टनर : मोहन ऑटो इंडस्ट्रीज प्रा. लि.
- फर्निचर पार्टनर : लकी फर्निचर

## आम्ही असू लाडके...

'आम्ही असू लाडके' चित्रपटाचं चित्रीकरण कोल्हापुरातीलच चेतना विकास मंदिर शाळेत झाले. या चित्रपटातील एक प्रार्थना शौनक अभिषेकी यांनी गायिली आहे. त्यानिमित्ताने त्यांची आणि जितेंद्र अभिषेकी यांची ओळख झाली. त्यानंतर शास्त्रीय संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. आपल्याला नेमकं काय आणि कशासाठी करायचं आहे, याची जाणीव देणारा हाच आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. पुढे मग 'बालगंधर्व', 'कट्यार काळजात घुसली', 'लोकमान्य', 'काशिनाथ घाणेकर' आदी चित्रपट पडद्यावर आले आणि ते प्रेक्षकांना भावले.

## नवी पिढी शास्त्रीय संगीताकडे

'कट्यार काळजात घुसली' नाटकाने नवी पिढी शास्त्रीय संगीताकडे वळली, असे सांगून सुबोध भावे म्हणाले,

''पुढे 'बालगंधर्व'च्या निमित्तानं वेगळा अनुभव घेता आला. बाईची भूमिका करण्यासाठी तब्बल २२ किलोग्रॅम वजन कमी केलं. सत्तावीस वारी साडी नेसायला लागायची आणि तिचे वजन तब्बल सोळा किलो होते. चित्रीकरणासाठी खरेखुरे दागिने वापरले. त्याची किंमत तीन ते पाच कोटींपर्यंत होती.'' एकूणच 'तुला पाहते रे' मालिकेतील विक्रांत सरंजामेंपर्यंतचा प्रवासही त्यांनी उलगडला. मंगेश पाडगावकरांच्या कवितेने संवादाची सांगता झाली.

## सुबोध भावे सांगतात...

- लहानपणी आपण पडतो आणि जखम होते, त्या वेळी सर्वाधिक आनंद होतो. मात्र, पुढे यशाच्या मृगजळामागे धावताना तो आनंद विसरतो. अपयश हेच खरे यश असते. कारण ते आपल्याला सतत जागं आणि जिवंत ठेवते.
- जेवणातील लोणच्याएवढचं महत्त्व स्पर्धेला असतं. खरी स्पर्धा आपली आपल्याशीच असावी.
- मेहनतीला 'ऑप्शन' नाही. व्यायाम ही अशी गोष्ट, की ती आपली आपल्यालाच करावी लागते.
- खासगी आयुष्य आणि काम या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत आणि त्या वेगळ्याच ठेवायला हव्यात.
- अंधारातूनही एखादा झरोका आपल्याला प्रकाश देत असतो. त्याकडे सकारात्मकतेने पाहूनच नेटानं पुन्हा उभारायला हवं.
- परीक्षेतील गुणांवर आधारित यशाची व्याख्या नक्कीच चुकीचीच. मुळात यश-अपयशापेक्षा आपण नेमकं ध्येय काय ठेवतो आणि त्यासाठी मेहनत कशी घेतो, या गोष्टींना अधिक महत्त्व असते.

लोकमत

## विनायक गोविलकर; शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान


# स्टार्टअप, मेक इन इंडियाने उत्पादकता वाढली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया, मुद्रा, आदी योजनांमुळे देशातील उत्पादकता वाढली. कृषिमालाला किंमत मिळाली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावर आली. आर्थिक विकासदर वाढला. मात्र, बेरोजगारी, आर्थिक विषमता ही आव्हाने अजून कायम आहेत, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठामधील उद्योग कक्ष आणि कोल्हापूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठातील राजर्षी शाहू

नसीर अत्तार




**शिवाजी विद्यापीठातील उद्योग कक्ष आणि विविध औद्योगिक संघटनांतर्फे अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांचे व्याख्यान झाले. यावेळी डावीकडून मोहन पंडितराव, विलास नांदवडेकर, ए. एम. गुरव, संजय शेटे, एस. डी. डेळेकर उपस्थित होते.**

सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. अर्थतज्ज्ञ विनायक गोविलकर म्हणाले, नोटाबंदी, जीएसटीची अंमलबजावणी करून भाजप सरकारने आर्थिक स्थैर्य देत देशाला राष्ट्रीय सकल उत्पन्नामध्ये अकराव्या क्रमांकावरून सहाव्या क्रमांकावर आणले. शेती, उद्योग क्षेत्राचा विकास, वित्तीय शिस्त आणि विविध योजनांमुळे देशाचा आर्थिक विकासदर बधारला. या सरकारने देशहिताचे अनेक निर्णय घेतले. मात्र, रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत.

### आर्थिक प्रवास मांडला

**या व्याख्यानात अर्थतज्ज्ञ गोविलकर यांनी स्वातंत्र्यानंतर ते आतापर्यंतचा देशाचा आर्थिक प्रवास मांडला. विविध सत्ताधारी पक्षांच्या कालावधीतील आर्थिक स्थितीची माहिती दिली.**

या कार्यक्रमास कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, 'स्मॅक'चे अध्यक्ष राजू पाटील, अतुल पाटील, विश्वजित कुलकर्णी, आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या उद्योग कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी स्वागत केले. 'गोशिमा'चे खजानिस मोहन पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी आभार मानले.

सकाळ

# 'मोदीनॉमिक्स'मुळे अर्थव्यवस्था भक्कम

## डॉ. विनायक गोविलकर : शिवाजी विद्यापीठ, चेंबर्स ऑफ कॉमर्सतर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शेती, उद्योग क्षेत्राचा झालेला विकास. वित्तीय शिस्त आणि कल्याणकारी व समाजाभिमुख योजना यामुळे देशाचा आर्थिक विकासदर वधारला आहे. भारत ही जगातील सहावी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थव्यवस्थेचे नवे प्रतिमान बनविले असून, या 'मोदीनॉमिक्स'मुळेच साडेचार वर्षांत अर्थव्यवस्था मजबूत बनली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांनी केले.



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना डॉ. विनायक गोविलकर. शेजारी मोहन पंडितराव, डॉ. डी. टी. शिर्के, संजय शेटे आदी.**

स्वतंत्र भारताचा आर्थिक प्रवास या विषयावर ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सभागृहात हे व्याख्यान झाले. शिवाजी विद्यापीठ, चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि अन्य औद्योगिक संघटनांतर्फे या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. स्मॅकचे संचालक मोहन पंडितराव यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

डॉ. गोविलकर म्हणाले, ''डॉ. मनमोहनसिंग यांनी अर्थव्यवस्थेला २००४-०८ या कालावधीत सावरले. आर्थिक विकासाला चालना मिळाली. मात्र, वित्तीय बेशिस्त, प्रचंड प्रमाणात झालेले भ्रष्टाचार यामुळे अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला. अन्न सुरक्षा कायदा, रोजगार हमी योजना अशा योजनांमुळे अर्थव्यवस्था बिकटस्थितीत गेली. २०१४ ते १८ या कालावधीत नोटबंदी, मेक इन इंडिया, स्टार्टप इंडिया, मुद्रा योजना यामुळे देशातील उत्पदकता वाढली आणि कृषी मालाला किंमत मिळाली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांकावरून ६ व्या क्रमांकावर आली. मोदींच्या पारदर्शक आणि प्रभावी कार्यपद्धतीमुळे मोदीनॉमिक्स हे अर्थव्यवस्थेचे नवे प्रतिमान बनले असून त्यामुळे अर्थव्यवस्था भक्कम बनवी आहे.''

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदीवडेकर, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, स्मॅकचे अध्यक्ष राजू पाटील, उद्योजक चंद्रकांत जाधव, सिनेट सदस्य एस. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
01/03/2019 Page No. 4

# विविध उपक्रमांनी विद्यापीठात मराठी दिन

## ग्रंथदिंडी, प्रवचन; म्हणीतून समाज दर्शन कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : ग्रंथदिंडी, कीर्तन आणि म्हणीतून समाजदर्शन हा सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांनी आज शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा दिन साजरा झाला. वि. स. खांडेकर भाषा भवनातील मराठी विभागातर्फे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त प्रख्यात साहित्यीक वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीदिवशी मराठी भाषा दिन साजरा करण्यात येतो. या निमित्ताने आज शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.



**कोल्हापूर : मराठी भाषा दिनानिमित्त गुरुवारी वि. स. खांडेकर भाषा भवनात झालेला मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम.**

सकाळी ग्रंथ दिंडी काढली. यावेळी सजवलेल्या पालखीत ग्रंथ ठेऊन त्यांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर टाळ मृदुंगाच्या गजरात ही दिंडी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून भाषा भवनात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, उपकुलसचिव डॉ.व्ही.डी. नांदवडेकर, ग्रंथपाल डॉ.नमिता खोत, मराठी विभाग प्रमूख डॉ.राजन गवस, डॉ.रणधीर शिंदे, डॉ.नंदकुमार मोरे हे उपस्थित होते. विद्यार्थी कुंडलीक पाटील यांनी संत तुकारामांचा अभंग 'आम्हा घरी धन, शद्बांचीच रत्ने' या अभंगावर किर्तन सादर केले. किर्तनातून त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व आणि वैशिष्टे सांगितले.

### सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रतिसाद

सायंकाळी वि.स.खांडेकर भाषा भवनातील हॉलमध्ये 'म्हणींमधील समाज दर्शन' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. यात म्हणींवर आधारीत लोकगीते, लोकनृत्ये सादर केली. कवी ग. दि. माडगुळकर आणि साहित्यीक पु. ल. देशपांडे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या साहित्यातील गितेही सादर केली. नृत्य, गायन आणि नाट्य प्रयोगाच्या कार्यक्रमाने समाज जीवनावरील मराठी भाषेचा प्रभाव दर्शवला. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# जपानी कलेचे प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात आज, शुक्रवारी सकाळी ११ ते ४ या कालावधीत विविध जपानी कलावस्तूंचे प्रदर्शन आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठातील वि.स. खांडेकर भाषा भवन इमारतीच्या प्रवेश दालनात भरविण्यात येणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

# विद्यापीठात रंगली 'बोलू कवतिके' मैफल

**कोल्हापूर टाइम्स टीम**

भाषेच्या उगमापासून ते बोली व प्रमाणभाषेतील गोडव्यापर्यंत... भावगीतातील हळुवार भाषासौंदर्यापासून पोवाड्यातील थरार आणणाऱ्या भाषेपर्यंत आणि अर्थातच मराठीपणाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करणाऱ्या कौतुकाने मराठी भाषादिनाची सायंकाळ उजळून गेली. पुण्याच्या सुरभी संस्थेच्या कलाकारांनी अभिवाचन, गाणी, गझल, बोली याविषयीच्या सादरीकरणातून मराठी भाषेची एकेक पाकळी रसिकांच्या ओंजळीत टाकली. बहरलेल्या या मैफलीने रसिकमन सुगंधित करून गेले.

राज्य सरकारच्या उच्च शिक्षण विभाग व शिवाजी विद्यापीठाच्यावतीने कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांची जयंती व मराठी राजभाषा दिनाच्या औचित्याने भाषा भवनच्या मंचावर मराठीचा कौतुकपटच उलगडला.

'जय शारदे वागेश्वरी' या आशा भोसले यांच्या आवाजातील सुश्राव्य शारदास्तवनाला कथ्थकनृत्यमुद्रांची जोड देत सुरभी संस्थेच्या कलाकारांनी या मैफलीचा पडदा खुला केला. मराठीपण जगणारा आणि मराठी भाषा नसानसात भिनलेला मराठी माणूस या भाषेवर कसा उत्कट प्रेम करतो हे सांगणाऱ्या हलक्याफुलक्या निवेदनाने हेमांगी कवी, प्रवीण जोशी आणि अनिरुद्ध दडके यांनी मराठी भाषेचे अवकाशच मांडले. मंगेश पाडगावकर यांच्या शब्दांतून साकारलेल्या 'या जन्मावर... या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे गीत सादर केले. मराठी साहित्यातील लोकप्रिय पान ठरलेल्या 'श्यामची आई' पुस्तकातील काही उताऱ्यांच्या साथीने मराठी संस्कारांचे महत्त्व या मंचावर मांडले. त्याला जोड मिळाली ती 'श्यामची आई' सिनेमातील दृश्यरूपांची. ओघवत्या निवेदनातून शीलालेखांपासून ते आजच्या समाजमाध्यमांमधील ब्लॉगपर्यंतचा प्रवास करत आलेली मराठी, तिच्यातील बदलांची वळणे, पिढीगणिक लहेजा या सगळ्याचा वेगळाच आलेख बोलू कवतिकेच्या निमित्ताने रसिकांनी अनुभवला.

अमित गद्रे



बोलू कवतिके कार्यक्रमात शारदास्तवन करताना प्राजक्ता राज व सहकारी.

## मराठी भाषादिनानिमित्त विविध कार्यक्रम

हेमंत वाळुंजकर, संजीव मेहेंदळे, अशोक काळे, मंजिरी जोशी, अनुराधा मराठे यांनी गायन केले, तर विक्रम भट, राजेंद्र दूरकर, राजू साळुंखे, विवेक परांजपे, केदार परांजपे, पंडित परांजपे यांनी वादन साथ केली. प्राजक्ता राज यांनी नृत्य सादरीकरण केले. यमुनाबाई वाईकर', पठ्ठेबापूराव, शाहीर राम जोशी यांच्या मूळ लावण्या रसिकांना ऐकायला मिळाल्या.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे निर्मितीप्रमुख ओंकार भिसे, मोहन पारसनीस , लेखक प्रवीण जोशी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चित्रफितीद्वारे संवाद साधताना शिक्षणमंत्री विनोद तावडे म्हणाले, 'यंदाच्या मराठीदिनाची मध्यवर्ती संकल्पना म्हणीतील गोडवा अशी आहे. मराठी भाषेच्या वैभवात म्हणी व त्यांचे जगण्याशी भिडलेले तंतोतंत अर्थ ही आपली फार मोठी मौखिक संपदा आहे. मराठी भाषा जपण्यात संस्कृती जपण्याचा अभिमान आहे.'

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह विभागप्रमुख, अधिकारी, रसिक उपस्थित होते. दरम्यान, बुधवारी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात आली. एक मार्चपर्यंत मराठी दिनानिमित्त विद्यापीठातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून, यामध्ये लोककलेचे रंग, कथा अभिवाचन, म्हणीतील समाजदर्शन या कार्यक्रमांचा समावेश आहे.

### विवेकानंद कॉलेज

स्वामी विवेकानंद कॉलेज येथे मराठी भाषा दिनानिमित्त मराठी भाषेच्या समृद्धीविषयी संवाद साधण्यात आला. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी होते. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, 'मराठी भाषेची समृध्दी वाढवायची असेल तर वाचना इतकेच सुसंवादाला देखील महत्त्व आहे. मराठी भाषेत खूप बारकावे आहेत. ते बोलण्याने समजून येतात. यासाठी ऐकण्याची क्षमता व वाचनाची गोडी प्रत्येकाने वाढविली पाहिजे. तरच मराठी भाषा महाराष्ट्रामध्ये टिकून राहील व ती सातासमुद्रापार जाईल.'

### प्रायव्हेट हायस्कूल

प्रायव्हेट हायस्कूल येथे मराठी राजभाषा दिनानिमित्त ज्येष्ठ कवीवर्य वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक बी. बी. पाटील यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थिनींनी मराठी गौरवगीत सादर केले. तसेच म्हणी व त्यांचे अर्थ या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुजय बेलवलकर व नीरज कौलगी यांनी नटसम्राट नाटकातील स्वगत सादर केले. एस. एस. देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. पी. एम. जोशी यांनी आभार मानले.

### दत्ताबाळ हायस्कूल

ताराबाई पार्क येथील दत्ताबाळ हायस्कूल येथे मराठी दिनानिमित्त कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. रचना माने यांनी मराठी भाषेच्या इतिहासाविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेविषयी माहिती देणारी भित्तीपत्रके तयार करून प्रदर्शन मांडले. संस्थेच्या अध्यक्ष पल्लवी देसाई, सचिव नीलेश देसाई, मुख्याध्यापिका कीर्ती मिठारी यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

### महावीर इंग्लिश स्कूल

सुर्वेनगर येथील महावीर इंग्लिश स्कूल मराठी भाषादिनानिमित्त कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. शाहीर रंगराव पाटील यांच्या हस्ते दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांनी भारूड, ओवी, पोवाडा, कोळीगीत, लोककलांचे सादरीकरण करून मराठी भाषेचे सौंदर्य खुलवले. महावीर जाधव यांनी प्रास्ताविक केले. तृप्ती साजणे यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. मराठी भाषेचा वापर दैनंदिन जीवनात कसा केला पाहिजे यावर कार्यक्रमात चर्चा करण्यात आली. प्राचार्य धनश्री व्हनागडे यांनी प्रास्ताविक केले.

# डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला आजपासून

कोल्हापूर (प्रतिनिधी) : इतिहास अधिविभाग छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने दि. १ व २ मार्च रोजी डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे डॉ. सी. आर. दास प्रमुख पाहुणे असणार आहेत. मराठा इतिहासलेखन पद्धतीचे नवे आयाम, अठराव्या शतकातील मराठेशाही : साम्राज्य आणि राजकारण, ओडिशा प्रांतातील मराठा राजकारण : १७५१-१८०३ या विषयावर व्याख्यानमालेचे दोन पुष्प गुंफणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

# ‘बोलू कवतिके’मधून नृत्य, संगीताची मेजवानी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठामध्य मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ‘बोलू कवतिके’ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रम कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, आणि रसिकांच्या उदंड प्रतिसादामध्ये झाला.

उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आले. म्हणींमुळे मराठी भाषा खऱ्याअर्थाने समृद्ध झाली आहे. हा दिवस आपण म्हणींना समर्पित करतो आहोत, ही महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठान मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘सुरभी’ प्रस्तुत ‘बोलू कवतिके’ या मराठी भाषेचे महत्त्व जनमानसावर ठसविणाऱ्या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मोहन पारसनीस व ओंकार भिसे यांची निर्मिती लाभलेल्या या कार्यक्रमात अभिनेत्री हेमांगी कवी यांच्यासह प्रवीण जोशी, अनिरुद्ध दडके सहभागी झाले होते. गीतांना हेमंत वाळुंजकर, संजीव मेहेंदळे, अशोक काळे, मंजिरी जोशी आणि अनुराधा मराठे यांचा स्वरसाज लाभला असून केदार परांजपे यांनी संगीत संयोजन केले. विक्रम भट, डॉ. राजेंद्र दूरकर, राजू साळुंके, विवेक परांजपे, केदार परांजपे व पंडित रमाकांत परांजपे यांचे वादन सहकार्य लाभले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांना गीत, संगीत व नृत्याची मेजवानीच मिळाली.

या गीत संगीताच्या मैफिलीत मोगरा फुलला, या जन्मावर, कुशलव रामायण गाती, मालवून टाक दीप, ने मजसी ने परत, जय देव शिवराया अशी अनेक श्रवणीय गीते सादर केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘बोलू कवतिके’ या कार्यक्रमांतर्गत नृत्य सादर करताना नृत्यांगना. (छाया : पांडुरंग पाटील)**

सकाळ

# जपानी कलावस्तूंचे आज प्रदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात शुक्रवारी (ता. १) विविध जपानी कलावस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन इमारतीच्या प्रवेश दालनात सकाळी अकरा ते चार या कालावधीत प्रदर्शन होईल. सर्वांनी या प्रदर्शन पाहण्यास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

सकाळ

# भारतीय तरुणांसाठी जपानी भाषेत करिअर संधी : मते

**कोल्हापूर, ता. २८ :** तीन वर्षे सातत्याने जपानी भाषा शिकल्यास करिअरमध्ये संधी आहे. जपानमध्ये लोकसंख्येतील तरुणांचे प्रमाण कमी आहे, तर भारतात तरुणांची संख्या जास्त आहे. भारतात ऑटोमोबाईल क्षेत्रात अनेक जपानी बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्यामुळे येथे जपानी भाषेत करिअरमधील संधी उपलब्ध होते. त्याचा मराठी तरुणांनी लाभ घेतला पाहिजे, असे आवाहन जपानी भाषा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुहास मते (पुणे) यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'जपानी भाषेतील शिक्षण व करिअर संधी' ही कार्यशाळा शिवाजी विद्यापीठ येथे झाली. यावेळी श्री. मते यांनी मार्गदर्शन केले. जपानी भाषा शिकल्याने कशा पद्धतीने करिअरची संधी आहे हे सांगितले. स्लाईड शोच्या माध्यमातून जपान व जपानी संस्कृती यांचा परिचय करून दिला. विदेशी भाषा विभागाच्या प्र.विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे अध्यक्षस्थानी होत्या.

जपानी भाषा शिक्षक संघाच्या सचिव श्रीमती संजीवनी कावले (पुणे) यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रश्न-उत्तरे सत्रात मार्गदर्शन केले. शिक्षिका श्रीमती स्नेहल शेटे व जर्मन भाषा शिक्षिका श्रीमती स्नेहा वझे उपस्थित होत्या. कार्यशाळेचे उद्‌घाटन रोपास पाणी घालून झाले.

समारोपात डॉ. पानसरे यांनी चित्रलिपी, सायोनारा, हाइकू, किमोनो, चहा समारंभ, हिरोशिमा-नागासाकी अशा शब्दांतून जपानी संस्कृती व इतिहास उलगडत असल्याचे सांगितले.

Kolhapur, Kolhapur-Today
01/03/2019 Page No. 2

सकाळ

# विद्यापीठात विज्ञान प्रदर्शनाला प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीतर्फे आज विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान दिनानिमित्त झालेल्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अभिनव प्रकल्प सादर केले.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, डॉ. ए. एम. गुरव, समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, सागर डेळेकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कला केंद्रात गुरुवारी विज्ञान प्रदर्शन झाले. या वेळी विद्यार्थ्यांना प्रयोगाची माहिती देण्यात आली.**

गोखले महाविद्यालयातील बी. एस्सी. तृतीय वर्षातील विद्यार्थी संचेत दळवी याने ॲटोमेटिक वॉटर अँड सेव्ह वॉटर हा प्रकल्प सादर केला. त्यात त्याने स्वच्छतागृहातील पाणी वापरासाठी प्रेस कॉकच्या उपयोगाचे संशोधन मांडले. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील वैभव बागे याने इको फ्रेंडली सोलर ड्रायर चे संशोधन सादर केले. त्यामध्ये पवन, सौरऊर्जा आणि जीओ कुलिंग सिस्टिमच्या वापरातून तयार केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. अंजली भोसले आणि प्रज्ञा कांबळे यांनी फूड प्रोसेस इंडस्ट्रिजसाठी उपयुक्त ठरणारी फळे, भाजी वर्गीकरण करणारे यंत्राचे संशोधन मांडले. इलेक्ट्रॉनिक्स विभागातील पांडुरंग गायकवाड याने घरातील पाणी व्यवस्थापनासाठीचे वायरलेस वॉटर लेव्हल कंट्रोल प्रकल्प सादर केला.